सार्वजनिक आरोग्य विभाग
क्र.:- ठामपा/वैआअ- १२६ /२०१९
दिनांक :- २५/०४/२०१९

प्रति,
श्री.शशिकांत काळे
मुख्य अग्निशमन अधिकारी
अग्निशमन विभाग
ठाणे महानगरपालिका,ठाणे

**विषय :- डे-केअर रुग्णालय/क्लिनिक या आस्थापनांना अग्निशमन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता नाही.**

**संदर्भ :- क्र.ठामपा/अति.आयुक्त (१)/०२/२०१९ दि.०५/०४/२०१९**

वरील विषयांस व संदर्भिय पत्रांस अनुसरुन मा.अति.आयुक्त (१) यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या दालनात सोमवार दि.०५/०४/२०१९ रोजी दुपारी ३.०० वा. झालेल्या बैठकीचा इतिवृत्त सर्व विभागांना मा.अति.आयुक्त (१) यांच्या स्वाक्षरीने पाठविण्यात आलेला आहे.

सदर बैठकीस संबंधित विभागाचे सर्व अधिकारी उपस्थित होते.

मुंबई नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट १९४९ मधील तरतुद विचारात घेता, ठाणे महापालिका क्षेत्रामध्ये सर्व दवाखाने/डिस्पेन्सरीज/डे केअर इ.आस्थापनांमध्ये ज्याठिकाणी रुग्ण सकाळी दाखल होऊन सायंकाळी डिसचार्ज केले जातात अशा आस्थापनांना (ज्या रात्रीच्या वेळी बंद असतात) अग्निशमन विभागाच्या ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नाही. तसेच ज्या रुग्णालयांना दि.३१/१२/२०१८ पर्यंतच्या कालावधीसाठी अग्निशमन विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे, अशा रुग्णालयीन आस्थापनांनी पुन्हा अग्निशमन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता रहाणार नाही अशा आस्थापनांनी फक्त दर ६ महिन्यांनी B Form सादर करणे बंधनकारक राहिल.

सदरहु आदेशाची अंमलबजावणी ठाणे महापालिका क्षेत्रात ठाणे महापालिका प्रशासनाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार तातडीने करावी असे आपणांस कळविण्यात येत आहे.

२५/४/२०१९

(डॉ.आर.टी.केंद्रे)
वैद्यकीय आरोग्य अधिकारी,
ठाणे महानगरपालिका,ठाणे

प्रत :- १) मा.आयुक्त सो.ठामपा,ठाणे यांजकडे माहितीसाठी सविनय सादर
२) मा.अति.आयुक्त सो.(१) यांजकडे माहितीसाठी सादर

ठाणे अग्निशमन दल
आवक क्र.: ६८
दिनांक : २६/०४/२०१९
टेबल :
घेणाऱ्याची सही

तेरात/२५४२०१९